P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – ०७/०३/२०२४

**दि. ०६/०३/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड १०७/२०२४. भादवि कलम ३०२,१४३, १४७,१४९, ५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०३/२०२४ रोजी ००/३० ते ०१/०० वाजे. सुमा. साईदर्शन सोसायटी समोर नेटके कॉलनी विकास नगर देहुरोड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०३/२०२४ रोजी ११.५७ वा |
| फिर्यादी | :- | विजय रामशरन थोरी वय.४७ वर्षे व्यावसाय -लेबल कॉन्टॉक्ट रा. संगिता मंदीअपार्टमेंट फ्लॅट नं. ०३ विकासनगर गणपती मंदीराराजवळ देहुरोड ता. हवेली जि.पुणे |
| आरोपी | :- | १)रोहन राजेश देशमुख वय.२३.वर्षे रा.साई कॉलनी ,सिध्दिविनायक मंदीरा जवळ, विकासनगर देहुरोड, पुणे<br>२) चिक्या उर्फ सुयश विलास देशमुख. वय.२६ वर्षे रा.सदर.<br>३)अमित कैलास वरगडे वय.२४ वर्षे ,रा.फ्लॅट नं.१८पारीजात अपा. स्वराजनगरी, तळेगाव चाकन रोड, तळेगाव दाभाडे ४)वैभव शिवाप्पा ओनी वय.२० वर्षे रा.फ्लॅट नं.२०२ निलीयम अपार्टमेंट स्वराजनगरी ,तळेगाव चाकण रोड,तळेगाव दाभाडे ता.मावळ,जि.पुणे<br>५.आदीत्य( पुर्ण नाव माहीत नाही ) ६.)महिला आरोपी ७).राजेश देशमुख रा.नेटके कॉलनी देहुरोड पुणे<br>**आरोपी क्र १ ते ४ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मुलगा नामे विशाल विजय थोरी वय-२४ वर्षे यास आरोपी क्र १ ते ५ यांनी मिळुन जुन्या भांडणाच्या तसेच आज झालेल्या भांडणाच्या कारणावरुन फिर्यादी यांच्या मुलाच्या डोक्यात लाकडी दांडक्याने ,सिमेंटच्या ब्लॉकने तसेच सिमेंटच्या कुंडी मारुन गंभीर जखमी करुन त्याचा खुन केला आहे. तसेच आरोपी क्र १ यांची आजी आरोपी क्र ६ हिने फोन करुन तेरे लडकेने रोहनके साथ वापस झगडा किया है, अभि वो २०-२५ लडके बुलाया है ,आज उसको छोडेंगे नही ,उसको बहुत मारेंगे. अशी फिर्यादीचे पत्नीस धमकी दिली व आरोपी क्र ७ याने फिर्यादीस तेरे लडके का अभि बहुत नाटक हो गया है आज उसको छोंडेगें नही उसको आज शॉट दिखाऐंगे ,उसको बहुत मारेंगे और बच गया तो उसकी चौकी में जमा करेंगें अभी तु फोन रख .अशी धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | वपोनि फटांगरे ९४२३६६९३९१ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी २५२/२०२४ भां.द.वि.कलम ३०२, आर्म अँक्ट, ४(२५) म.पो. अधि ३७(१) (३) १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०५/०३/२०२४ रोजी १९/०० वा ते दि.६/०३/२०२४ रोजी सकाळचे ७:०० वा. चे सुमारास ए २२, विंड मिल व्हिलेज, बावधन, ता. मुळशी जि. पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि०६/०३/२०२४ रोजी १८.२१ वा. |
| फिर्यादी | :- | संदिप सुभाषचंद जैन, वय ५७ वर्ष धंदा नोकरी, रा. ए २२, विंड मिल व्हिलेज, बावधन, ता. मुळशी जि. पुणे |
| आरोपी | :- | महेंद्र दयालचंद जैन, वय ७९ वर्ष, रा. ए २२, विंड मिल व्हिलेज, बावधन, ता. मुळशी जि. पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे सासू सासरे यांचा गावी जाण्यावरुन किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर फिर्यादी यांचे सासू सासरे हे त्यांच्या बेडरूम मध्ये झोपण्यास गेले त्यानंतर दिनांक ६/०३/२०२४ रोजी फिर्यादी हे सकाळी ६:१० वा. मॉर्निग वॉक करून, घरी टी.व्ही बघत होते. फिर्यादी यांची पत्नी सकाळी ०७:०० व्या दरम्यान त्यांचे आई वडीलांना उठवण्यासाठी ते राहत असलेल्या रूममध्ये गेल्या असता. फिर्यादी यांचे सासरे आरोपी, यांनी घराच्या बागेतील कामाकरीता आणेलेले कोयत्याने फिर्यादी यांचे सासू मयत नामे आशा महेंद्र जैन वय ७५ वर्षे यांचेवर लोखंडी कोयात्याने वार करून स्वतः च्या शरीरावरती लोखंडी कोयत्याने वार करून दोघेही जखमी अवस्थेत पडल्याचे दिसले. सदरच्या घटनेमध्ये फिर्यादी यांची सासू मयत झाली असून, सासरे हॉस्पीटलमध्ये उपचार घेत आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि धुमाळ ८५३०८६६३३३ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड २५८/२०२४ भादंवि कलम ३९४,५०४, ५०६,३४, सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) सह १३५ सह क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३, ७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०५/०३/२०२४ रोजी सायं. १७.०० वा चे सुमा. दुर्जन ॲटो गॅरेज समोरील मोकळे मैदानात, कुणाल हॉटेल मागे, रहाटणी काळेवाडी लिंक रोड, रहाटणी, पुणे.

गुन्हा दाखल :- दि.०६/०३/२०२४ रोजी ००/३० वा

फिर्यादी :- पंकज संतोष चोथे वय २४ वर्षे व्यवसाय- ईलेक्ट्रीशियन, रा. हारकोड जिमच्या मागे, जगताप नगर लेन न ०६, थेरगाव पुणे.

आरोपी :- १)पप्या गिरी वय अंदाजे ३० वर्षे रा. मोरेवस्ती, चिखली पुणे. व त्याचे इतर दोन साथीदार
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मित्र श्रवण माचरे असे दोघांनी मिळुन शिफ्टने चालविण्यासाठी ॲटोरिक्षा घेतलेली होती. ती दुरुस्त करण्यासाठी ते दोघे कुणाल हॉटेल पाठीमागील दुर्जन ॲटो येथे गेले असताना तेथेच बाजुला मोकळे जागेत आरोपी हा त्याचे दोन मित्रांसह दारु पित बसला होता. फिर्यादी यांनी गॅरेजवाल्याला ॲटोरिक्षा दुरुस्त करण्यास सांगुन तेथुन जात असताना आरोपी याने फिर्यादी यांना त्याचेकडे बोलाऊन घेतले व फिर्यादी यांचे नांव विचारले. त्यावेळी फिर्यादी यांनी त्याला माझे नांव पंकज चोथे असे सांगीतल्याने त्याने फिर्यादी यांना जाण्यासाठी सांगीतले. फिर्यादी त्यांचा मित्र श्रवण माचरे याचे गाडीवर बसुन जाणार तेवढ्यात आरोपी हा फिर्यादी यांचेकडे आला व त्याने फिर्यादी यांना आठव मला ओळखला का ते, त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास भाऊ मी ओळखले आहे, त्यावेळीही माझी काही चुकी नव्हती, काही असेल तर स्वारी. असे फिर्यादी म्हणाले असता त्याने त्याचे सोबतचे दोन मित्रांना हाच रे तो, याने मला मागच्यावर्षी मारहान केली होती, असे म्हणुन त्याने फिर्यादी यांना शिवीगाळी केली व हाताने मारहान करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी त्याचेसोबतचे दोघांनीही फिर्यादी यांना शिवीगाळी करुन हाताने मारहान करण्यास सुरुवात केल्याने फिर्यादी यांनी त्या सर्वांना स्वारी स्वारी म्हणत असतानाच आरोपी याने ॲटोरिक्षाचे गॅरेजवरील लोखंडी रॉड घेऊन फिर्यादीचे डोक्यात जोरात मारला. त्यावेळी फिर्यादी यांचे सोबतचा मित्र श्रवण माचरे घाबरुन तेथुन पळुन गेला. फिर्यादी हे जखमी अवस्थेत असतानाही आरोपी याचे सोबतचे दोन साथीदारांनी फिर्यादी यांना पकडले व आरोपी याने जबरदस्तीने फिर्यादीचे पॅंन्टचे उजवे खिशातील विवो कंपनीचा मोबा फोन व रोख २१००/- रु काढुन घेतले व तेथेच आरडाओरडा करुन दहशत निर्माण करु लागल्याने आजुबाजुचे लोक तेथुन निघुन गेले. त्याचवेळी त्याने त्याचे मोबा. फोनवरुन आणखीन त्याचे मित्र बोलाविल्याचे फिर्यादी यांनी ऐकल्याने फिर्यादी तेथुन पळाले. त्यावेळी आरोपी याने मला परत मिळाला तर जीवे ठार मारुन टाकीन अशी धमकी दिली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि नलावडे ९५५२५२०१८३

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी ९१ /२०२४ भा.दं.वि.कलम४५२,४२७, ३२३,५०४, ५०६ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०६/०३/२०२४ रोजी स.०८-०० वा. सुमा.रो हाउस नं. ५३/७,सेक्टर नं २५,दक्षिणमुखी मारुती मंदिरा शेजारी, सिंध्दुनगर प्राधिकरण,निगडी,पुणे

गुन्हा दाखल :- दि. ०६/०३/२०२४ रोजी २३/ २५ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- महीला आरोपी

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील महिला आरोपी हिने फिर्यादी यांचे रो हाउस मध्ये (घरात) अनाधिकृतपणे प्रवेश करुन आरोपी यांची गाडी ओली केली तसेच त्यांचे मुलीस भिजविले असे समजुन चिडुन जावुन फिर्यादी यांना हाताने मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केली तसेच फिर्यादी यांचे चष्म्याचे नुकसान केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ देवरे ७८७५२८७५९८

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी २४९/२०२४ भादवि कलम- ३२६, ३२४, ३२३, ५०६, ३४ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०५/०३/२०२३ रोजी १२.३० वा. सुमा. मावळ मुळशी तालुका उप-विभागीय अधिकारी कार्यालय, बावधन ता.मुळशी जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०३/२०२४ रोजी ०१.३२ वा. |
| फिर्यादी | :- | मधुकर रतिकांत जगताप वय-४५ वर्षे धंदा-शेती, रा. मु.सांगवडे पो.देहुरोड, ता.मावळ जि.पुणे |
| आरोपी | :- | १)तुषार नथु जगताप वय-३५वर्षेरा.सांगावडे ता.मावळ जि.पुणे<br>२)किसन दगडु जगताप वय-९० वर्षे रा.सदर<br>व दोन अनोळखी इसम वय-३० वर्षे अंदाजे पुर्ण नाव व पत्ता माहित नाही.<br>**आरोपी अटक नाहीत** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे मावळ मुळशी तालुका उप-विभागीय अधिकारी कार्यालय,बावधन ता.मुळशी जि.पुणे येथे कौटुबिक जमीनीचे वादाची तारीख असल्याने आले असता नमुद आरोपी क्र १ व २ याने फिर्यादीचे पाठीवर व पायावर दगडे मारुन व दोन अनोळखी इसम यांनी फिर्यादीला लाथांबुक्यांनी मारहाण करुन गंभीर जखमी केले. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पांचाळ ८९२८३७६१०० |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी १९४/२०२४ भादवि कलम ३२६,३२३, ५०४,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०६/०३/२०२४ रोजी २२/५५ वा रमाबई नगर पिपरी |
| गुन्हा दाखल | :- | दि ०६/०३/२०२४ रोजी २२/५५ वा |
| फिर्यादी | :- | वसंत साहेबराव गायकवाड वय ३९ वर्ष धंदा चालक रा रमाबाई नगर पिपरी पुणे |
| आरोपी | :- | १)रोहित शरद गाडे<br>२) शरद गाडे रा रमाबई नगर पिपरी पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरुन फिर्यादी यांना आरोपी नं १ याने लोखंडी रॉड ने डोक्यात व उजव्या हाताला मारुन गंभीर जखमी केले व आरोपी नं २ याने वाईट वाईट शिवीगाळ करुन हाताने मारहान केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि देशमुख ९४२००५७१७३ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड २६७/२०२४ भादंवि कलम ३०८,३२३ ,५०४,५०६, क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०५/०३/२०२४ रोजी १७.०० वा चे सुमा. दुर्जन ॲटोगॅरेज समोरील मोकळे मैदानात, कुणाल हॉटेल मागे, रहाटणी-काळेवाडी लिंक रोड, रहाटणी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०३/२०२४ रोजी २३/३३ वा |
| फिर्यादी | :- | गिरीष दिपक मनवे ऊर्फ पप्पु गिरी वय २८ वर्षे धंदा- माताडी कामगार रा. सिंहगड कॉलनी, सानेचौक, चिखली पुणे. |
| आरोपी | :- | पंकज संतोष चोथे वय २४ वर्षे रा. हारकोड जिमच्या मागे, जगताप नगर लेनन ०६, थेरगाव पुणे. मुळगांव- रविवार पेठ, सोलापुर<br><br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे दुर्जन ॲटो गॅरेज येथे थांबलेले असताना आरोपी हा त्याठिकाणी आला व फिर्यादी यांचेकडे रागारागाने पाहत होता. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास काय बगतोस, असे विचारले असता त्याने तुला आठवले का, मागच्या वर्षी मला मारले होते, असे म्हणाला असता फिर्यादी यांनी त्यास जाऊदे भाऊ |

सोडुन दे विषय असे म्हणाले असता त्याने फिर्यादी यांना शिवीगाळी करुन, हाताने मारहान करुन तुला खुप माज आला आहे, आता तुला खलासच करतो असे म्हणुन त्याने त्याच ठिकाणी पडलेला मोठा दगड उचलला व जोरात फिर्यादी यांचे डोक्यात मारला. परंतु तो वार फिर्यादी यांनी चुकविला व ते बाजुला पळाले. फिर्यादी हे घाबरल्याने व भितीने तेथुन पळुन गेले. फिर्यादी पळुन जाताना आरोपी याने फिर्यादी यांचेकडे पाहुन शिव्या देत तेथील येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना हातात दगड घेऊन धमकी देत मी इथला भाई आहे, असे म्हणून शिवीगाळ करत कोण त्याला वाचवतो पाहतोच. असे मोठमोठ्याने म्हणत होता. आरोपी याने केलेल्या दगडाचे वारामुळे फिर्यादी यांचा जीव जाऊ शकतो, याची त्याला जानीव असतानाही आरोपी याने मोठा दगड घेऊन फिर्यादी यांचे डोक्यात वार केला. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि नलावडे ९५५२५२०१८३

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव एमआयडीसी ४७/२०२४ भा.द.वि कलम ३७९, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि-०४/०३/२०२४ रोजी ००/०० ते पहाटे ०३/३० वा. चे दरम्यान श्री समर्थ टेक प्रोसेस इंजिअरिंग प्रा लि कंपनीचे मालकीचे प्लॉट नं.डी ८० पीएपी फेल २ कंपनीचे इमरसन कंपनीचे समोर मोकळ्या जागेत

गुन्हा दाखल :- दि०६/०३/२०२४ रोजी १६.४८ वा

फिर्यादी :- अरपित नारायण इंगळे वय ३७ वर्षे व्यवसाय नोकरी रा तनिष्क पार्क फ्लॅट नं १३०४ चऱ्होली पुणे.मुळ रागजानन कॉलनी ता खामगाव जि बुलढाणा

आरोपी :- अज्ञात इसम

**निष्पन्न आरोपी –**

संजय धर्मा साह वय ३७ वर्षे राजाधववाडी मिंडेवाडी ता मावळ जि पुणे मुळ रा उत्तर मोहल्ला महुवा जवळ जामलहाता पोगोपालपुर बाकरगंजता हुसेनगंज जि सिवान रा उत्तरप्रदेश

**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील श्री समर्थ टेक प्रोसेस इंजिअरिंग प्रा लि कंपनीचे मालकीचे प्लॉट नं.डी ८० पीएपी फेल २ कंपनीचे इमरसन कंपनीचे समोर मोकळ्या जागेत एक वर्षापुर्वी ठेवणेत आलेले लोखंडी बिम,लहान मोठे आकाराचे ट्रक्चर बेड जाळी ०१ नग, रोलींग प्लेट ०१ नग असेएकुण १२ नग अंदाजे २० टन मटेरियल किं. १०,००,०००/- रु चा माल हा कोणीतरी इसमाने क्रेनचे साहाय्याने दोन टेम्पो मधुन चोरुन नेला आहे.म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा जाधव ९६३७४९६०६१

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण १५५/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधि. कलम ६५(फ) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०६/०३/२०२४ रोजी १३.०० वा चे सुमा पिंपरी गांव ता.खेड जि.पुणे गावचे हददीत भामा नदीचे लगत रंगनाथ देवराम काळे यांचे मालकीचे मोकळे जागेत

गुन्हा दाखल :- दि.०६/०३/२०२४ रोजी १६/१३ वा

फिर्यादी :- राहुल हरिश्चंद्र सुर्यवंशी पो.शि.२७१८ नेमणुक गुन्हे शाखा, युनिट-३,पिंपरी चिंचवड शहर

आरोपी :- आदित्य राघु कुंभार रा.रोहकलरोड, चाकण, ता.खेड, जि.पुणे

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी याने बेकायदा गावठी हात भटटी साठी लागणारे अंदाजे ५,०९,६००/- रु. चे २५,४८० लिटर कच्चे रसायण जवळ बाळगुन हातभटटीचे दारुची भटटी अनाधिकाराने, विनापरवाना, बेकायदेशीर रित्या लावली असताना मिळुन आला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोना साबळे ९७६६७२१७२३

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ८९ /२०२४ भा. द. वि. कलम ४०६,४२० प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६.०३.२०२४ रोजी स.०९.३५ वा.चे सुमारास एल आय जी कॉलणी प्राधिकरण निगडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६ /०३/२०२४ रोजी २२/०९ वा |
| फिर्यादी | :- | कलीयाप्पान जी वय २७ वर्षे धंदा-नोकरी रा.बी.६/६ से.२५ एल आय जी कॉलणी प्राधिकरण निगडी पुणे मुळ पत्ता घर न.८९ ए करीएपेरुमल वालासाई पावक्कल पो.उथानगरी जि.कृष्णागिरी राज्य तमिळनाडु |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी एम एच १५ जी बी ५४८९ पल्सर २२० वरुन आलेल्या अनोळखी इसमाने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांचेकडुन फिर्यादी यांचा मित्र चिरींजीवी याची ९०,०००/- कि.ची बजाज पल्सर २२० मोटार सायकल क्र.एम एच १४ जे डब्ल्यु ८००२ ही मोटार सायकल फिर्यादी यांचा विश्वासघात करुन घेवुन पळुन गेला व फिर्यादी यांचे मित्राची मो.सा. परत न देता स्वतःचे अर्थिक फायद्याकरीता त्यांची फसवणुक केली आहे.म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि यलमार ९४२३२३९९४३ |